# दिनांक: ३/९/२४

# विषय : २२/८/२४ रोजी आयोजित वार्षिक सर्व साधारण सभे चे इति वृत्तान्त.

## पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

### वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी, दिनांक २२.९.२०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता संस्थेच्या मधुकर जोशी सभागृहात सुरू झाली. पुरेशी गणसंख्या नसल्याने अध्यक्षांनी सभा तहकूब केली. तहकूब सभेला एकूण ५६ सभासद/सहसभासद उपस्थित होते.

अध्यक्षांनी सभेला सुरुवात केली व चिटणिसांना विषयाप्रमाणे सभा घेण्यास सांगितले. त्यानंतर चिटणिसांनी सभेपुढे विषय मांडले

**विषय क्रमांक 1** - गतवर्षातील, सभासद आणि त्यांच्या कुटुंबातील दिवंगतना श्रद्धांजली अर्पण करणे.
श्रीमती रेखा जोग, श्रीमती मीरा शालिग्राम, श्रीमती आशा कृष्णमूर्ती, श्रीमती वत्सला जगझाप, श्री. हेमंत जोगदेव, श्री. चंद्रकांत दीक्षित, श्री. अनिरुद्ध बागूल यांना व देशासाठी शहीद झालेल्या ज्ञात-अज्ञात शहिदांनाही सभेने दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

**विषय क्रमांक 2** – सन २०२२ -२०२३ च्या वार्षिक सभेचा जोडलेला अहवाल मंजूर करणे.
सन २०२२ -२०२३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**विषय क्रमांक 3** - सन १.४.२०२३ ते ३१.३.२०२४ चा वार्षिक अहवाल जमा नावे पत्रक, ताळेबंद मंजूर करणे.
वरील विषयावरील चर्चेच्या वेळी श्री. प्रवीण विडकर, श्री. अजय डोंगरे, श्री. प्रदीप नेवाळकर यांनी चर्चेत सहभाग घेतला. त्यानंतर चिटणीसांनी सन १.४.२०२३ ते ३१.३.२०२४ चा वार्षिक अहवाल जमा नावे पत्रक, ताळेबंद अहवाल मंजूर करण्यासाठी सभेपुढे ठेवला. तो ५२ विरुद्ध १ मताने मंजूर करण्यात आला.

**विषय क्रमांक ४** - १.४.२४ ते ३१.३.२५ साठी अंतर्गत लेखाविषयक व वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.
अंतर्गत लेखापरीक्षक म्हणून आर. ए. करंदीकर आणि कंपनीची व वैधानिक लेखापरीक्षक म्हणून सचित चव्हाण यांची नेमणूक करण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली.

**विषय क्रमांक ५** - नव्या बदलानुसार प्रत्येक सभासदास नवीन ५ शेअर सर्टिफिकेट्स देण्याबाबत निर्णय घेणे.

या विषयावरील चर्चेनंतर सर्व सभासदांना ए ४ साइजचे नवीन १० शेअर सर्टिफिकेट्स देण्याचे ठरविण्यात आले. तसेच नवीन ५ शेअर सर्टिफिकेट्ससाठी प्रत्येक सभासदाकडून २५० रुपये घेण्याचे ठरविण्यात आले.

**विषय क्रमांक ६** - मार्च २०२५ पर्यंत देखभाल-दुरुस्ती घेणेबाबत निर्णय घेणे.
या विषयासंबंधी बोलताना चिटणीसांनी श्री. महेश प्रभुदेसाई यांचे देखभाल-दुरुस्ती घेऊ नये, असे पत्र आल्याचे सांगितले. तेव्हा श्री. अजय डोंगरे, श्री राजेश शहा यांनीपण याप्रमाणे करावे, असे सुचविले. त्यावर श्री राजीव सावडे यांनी, जोपर्यंत जागा खाली करत नाही तोपर्यंत देखभाल-दुरुस्ती घ्यावी, असे सुचविले. त्यानंतर मार्च २०२५ पर्यंत देखभाल-दुरुस्ती घ्यावी असा ठराव चिटणीसांनी मांडला. त्यावरील मतदानात हा ठराव ५३ विरुद्ध ३ मतांनी संमत करण्यात आला.

**विषय क्रमांक ७** - पुनर्निर्माणाच्या पुढील खर्चासाठी रु. २ लाखाची तरतूद करणे.
या विषयावर बोलताना श्री. अजय डोंगरे, श्री. प्रवीण बिडकर यांनी आपले मत मांडले व श्री. प्रदीप नेवाळकर यांनी, हा काय खर्च असू शकतो याची माहिती दिली. त्यानंतर चिटणीसांनी तो ठराव मंजुरीसाठी सभेपुढे ठेवला. ५४ विरुद्ध २ मतांनी तो मंजूर करण्यात आला.

**विषय क्रमांक ८** - संस्थेकडे सध्या असलेल्या बॅंक डिपॉझिटबाबत सल्लागारांचा सल्ला घेऊन निर्णय घेणे.
या विषयावरील चर्चेत श्री. जयराम देसाई यांनी श्री. दिलीप पटवर्धन यांनाच सल्लागार नेमावे, असे सुचविले. त्यानंतर चिटणीसांनी सभेला याबाबतची पंचसमितीची भूमिका सांगितली. हा ठराव मताला टाकला असताना तो ५५ विरुद्ध १ मताने संमत झाला.

**विषय क्रमांक ९** - अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.
यावेळी संस्थेकडून आयत्या वेळचा कोणताच विषय नसल्याची माहिती चिटणीसांनी सभेला दिली. तसेच सभासदांकडूनही काही विषय मांडण्यात आले नाहीत. त्यावर चिटणीसांनी अध्यक्षांना सभा समाप्त करण्याची विनंती केली.
त्यावर अध्यक्षांनी सर्व सभासदांचे आभार मानले. लोकशाही पद्धतीने ही सभा पार पाडली, याबद्दल त्यांना धन्यवाद दिले व ही वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्याचे अध्यक्ष श्री. विजय सावंत यांनी जाहीर केले.

पंचसमिती

[signature]

**विनायक पटवर्धन**
**(चिटणीस)**

[stamp: ... सह. गृहरचना संस्था ... रजि. नं. PNA/HSG/ ... पत्रकारनगर, पुणे - ४११ ०१६]